२९५
सांकेतांक क्र 1990050522

६९
पी. ६३
३१३

विषय /- गटबुके व ग्रामनकाशे अद्यावत आणणेबाबत.

क्रमांक एस.व्हो.सी.आर.३१५०/२४/९०
पुणे, दिनांक :- /५/१९९०
5 MAY 1990

पुरवणी परिपत्रक -

इकडील परिपत्रक क्र.एस.व्हो.सी.आर.३१५०/२-४, दिनांक १८.४.९० अन्वये गट बुके व ग्रामनकाशे अद्यावत आणणेकामी काढलेल्या परिपत्रकात मुद्दा क्र.४ मध्ये गटबुक करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापि या परिपत्रकाव्दारे गटबुक कसे अद्यावत करावे याबाबत आणखी जादा सूचना देण्यात येत आहेत.

ज्या गांवी एकत्रीकरण योजनेचे काम झालेले आहे, परंतु गटाचा नकाशा उपलब्ध होत नाही अशा गांवचे काम स.नं.चा नकाशा घेवून व त्यात हिस्सा प्लॉटिंगने हिस्से बसवून व त्यावर जमीन एकत्रीकरण योजना/जबाब फाईल/पैकी वाळणी इत्यादि अभिलेखाचे आधारे गट मारुन ते काम सुरु करणेत यावे. गटाचे नकाशे उपलब्ध असणाऱ्या गावांची गटबुके ही गटाचे नकाशावरुन करणेची आहेत व गट आकाराने लहान असतील तर गटबुक करतांना एका पानावर एकापेक्षा जास्त गट टोचावेत. शक्यतो एका स.नं.मध्ये जेवढे गट असतील तेवढे गट टोचावेत टोचण्यात यावेत व गटबुकाचे मागील पानावर प्रपत्र ६ मध्ये स.नं./हिस्सा नंबर/गट नंबरचा जो तपशील भरावयाचा आहे त्या ठिकाणी गटनंबर नमूद करुन कसांत त्या गटाचा स.नं./हि.नं.शक्यतो सहजा सहजी रेकॉर्ड उपलब्ध होत असेल तर नमूद करावा. उदा. गट नंबर १२[स.नं.६/४अ+४ब]. सदर कामासाठी जमीन एकत्रीकरण योजने वेळच्या ब्लू प्रिंटचा आधार घ्यावा. तसेच गोळा नंबर असेल व त्याचे आकारमान मोठे असेल तर एका पानावर एकच गटनंबर/स.नं.टोचण्यात यावा.

ज्या गांवी एकत्रीकरणाचे काम झालेले नाही अशा गावाचे गटबुक तयार करतांना एका पानावर एक स.नं. व त्यातील हिस्से बसवणेत यावेत. सदर हिस्से बसवितांना ज्या स्केलात वाळणी असेल त्या स्केलात ते बसविण्येत यावेत कि, जेणेकरुन जागेवरील मोजणी काम लवकर करणे सोईचे जाईल.

...२/---

उदा:- जर मोजणी १" : २ $\frac{१}{२}$ साखळीतील असेल व त्या प्रमाणे जर गटबुक तयार केले तर १:१००० या परिमाणात मोजणी करणे सोयीचे होईल. तसेच एका पानात एक स.नं. बसत नसेल तर पुर्वी दिलेल्या सुचनेनुसार दोन पानांत स.नं./हिस्से दाखविण्यात यावेत व गट बुकाचे खाली सोईस्कर कोप-यात खाळणी वर्णी नमूद करावे.

मोजणी वेळी शेताचे कोप-यात फार्म हाऊस, घर असल्यास कायम स्वरुपी बांध/हद्दी खुणांचा आधार घेवून टेपने अचूक मापे घेवून फार्म हाऊस/घर बसविणेत यावे. आवश्यकतेनुसार त्याच्या अचूकपणाची क्रास मापाने खात्री करणेत यावी.

क.जा.प.चे काम करताना जर छोटे क.जा.प्र. चे काम असेल तर ते प्रथम पुर्ण करावे. जर क.जा.प.चे काम मोठ्या प्रमाणात असेल व जास्त कालावधी लागणार असेल तर असे क.जा.प.करणेच्या कामात वेळ घालवू नये. फक्त भू-संपादन/बिनशेती इत्यादि मोजणी आलेखाचे आधारे गट बुकात व गांवचे नकाशात दुरुस्त्या बसवाव्यात व कार्यालयाकडे कोणते मोठे क.जा.प. काम करणेचे राहिलेले आहे याचा तपशील द्यावा व कार्यालयाने तालुक्याकरिता एक नोंदवही ठेवून कोणत्या गांवचे, कोणते मोठे क.जा.प. काम राहिले याची नोंद ठेवावी.

गट बुकात ज्या बाजूला आकृति आहे तेथे वर नमूद केले प्रमाणे खाळणी वर्णी सोयीस्कर कोप-यात नमूद करावे. तसेच मोजणी वेळी आढळून येणा-या महत्वाच्या बाबी गट बुकात नमूद करावयात. उदा. :- वड, पिंपळे झाड, आंबराई, सागवान, अन्य फळझाडांच्या बागा, गायरान पड, नदी, ओढा, बंधारे, जंगल, मंदिरे इत्यादि, मंदिरे दर्शविताना त्याचे जागेवर अस्तित्वात असलेले बांधकाम हॅचिंगने दाखवावे, तसेच मंदीरा बाबतचा तपशील थोडक्यात नमूद करावा. जसे महादेवाचे मंदीर इत्यादी. तसेच गट बुक/नकाशात मूळ नकाशा मध्ये असणारे व भूसंपादनाने झालेल्या रस्त्या बाबतचा तपशील दाखविण्यात यावा.

बिनशेती मोजणी ही १: ५०० या परिमाणात केली जाते. तथापि ग्राम नकाशी अद्ययावती करणाचे कामातील वेळेची बचत व्हावी म्हणून व सदर काम गट बुकात दाखविण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून बिनशेती मोजणी देखील १:१००० या परिमाणांत करणेत यावी व ती गट बुक / नकाशात बसविणेत यावी. सदरची १:१००० या परिमाणांत बिनशेती कामी केली जाणारी मोजणी ही ग्रामनकाशी अद्ययावतीकरण एवढ्या पुरती मर्यादित राही

वरील बाबी खेरीज अन्य बाबी/अडचणी आल्यास त्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी सोडविण्याच्या आहेत. त्या सोडवितांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी गांव नकाशे अद्यावतीकरणाचा हेतु लक्षांत घेऊन सदर काम विधायकरित्या दिनांक ३१.१२.१९९० पुर्वी [illegible] पूर्ण करणेचे आहे ही बाब कटाक्षाने लक्षांत घ्यावी.

जेथे खाजगी स्वरुपात रस्ते वाहतुकीच्या / वहिवाटीच्या सोयीचे दृष्टीने केले आहेत तेहि गटबुकात दाखवावेत व त्यात खाजगी स्वरुपातील रस्ता अथवा कारखान्याने तयार केलेला रस्ता असा उल्लेख ठेवावा.

सही/-[ नवीन कुमार ]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म.रा.] पुणे.

// निर्गमित //

सहाय्यक जमाबंदी आयुक्त,
[भूमापन] पुणे.

मोरे १०/-

....